## जाहीर नोटीस (१)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चऱ्होली येथील स.नं. १९४/१ पै. मधील श्रीमती यशोदाबाई काशिनाथ भोसले, श्री.काळूराम काशिनाथ भोसले व इतर यांसी तर्फे कुलमुखत्यारधारक सच्चिदानंद प्रॉपर्टीज तर्फे प्रोप्रायटर श्री.मुकेश ओमप्रकाश मल्लिक व जी.एस.प्रमोटर्स तर्फे भागीदार श्री.गुरुबक्ष विशनदास पेहलानी यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील २४ मी.रस्त्याने ६९८ चौ.मी. व आ.क्र. २/९२ माध्य. शाळा या प्रस्तावाने बाधित क्षेत्र १९०३.६२ चौ.मी असे एकूण २६०१.६२ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

मौजे च-होली स.नं. १९४/१पै. मधील मंजूर विकास योजनेतील २४ मी. रस्त्याने ६९८ चौ.मी. व आ.क्र. २/९२ माध्य. शाळाने १९०३.६२ चौ.मी. बाधित क्षेत्र असे एकूण २६०१.६२ चौ.मी.

चतु:सिमा-

उत्तरेस :- स.नं. १९३ ची मिळकत<br>
दक्षिणेस:- स.नं. १९४ पैकी ची मिळकत<br>
पुर्वेस :- स.नं. १९४ ची मिळकत<br>
पश्चिमेस :- स.नं. २३० ची मिळकत

जाहीर नोटीस (२)

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवासा सदर मिळकतीच्या हितसंबंधितांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजेमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल, व जमीन महापालिका ताब्यात घेतील. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट – १)

मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील - मौजे चिखली येथिल गट नं. १५९४ पै. मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र १४३.३७ चौ. मी. क्षेत्राची चतुःसीमा व मिळकतधारक पुढील प्रमाणे आहे.

मिळकतधारकः- श्री. राजेंद्र रेवनाथ ताटे व श्री. ताराचंद्र हनुमंता कांबळे

चतु:सिमा : -
उत्तरेस :- लागू गट नं. १६५२ ची मिळकत.
पुर्वेस :- लागू गट नं. १६५२ ची मिळकत.
दक्षिणेस :- लागू गट नं. १५९४ पै. ची मिळकत.
पश्चिमेस :- लागू गट नं. १५९४ पै. ची उर्वरित मिळकत.

परिशिष्ट – २)

मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील - मौजे चिखली येथिल गट नं. १५९४ पै. मधिल मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र ७२.५० चौ. मी. क्षेत्राची चतुःसीमा व मिळकतधारक पुढील प्रमाणे आहे.

मिळकतधारकः- श्री. संतोष दत्तात्रय फुरडे

चतु:सिमा : -
उत्तरेस :- लागू गट नं. १५९४ पै. ची मिळकत.
पुर्वेस :- लागू गट नं. १५९४ पै. ची मिळकत.
दक्षिणेस :- लागू गट नं. १५९४ पै. ची मिळकत.
पश्चिमेस :- लागू गट नं. १५९४ पै. ची उर्वरित मिळकत.

## जाहीर नोटीस (३)

सर्व संबधीतांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून विकास हक्काच्या (डी.आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र , गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी ,लीज, लीन, चार्ज , इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हिंतसंबध असल्यास संबधितांने प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे - ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरुपात दयावी सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबध नाही असे समजून किंवा असल्यास संबधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमीनीचा मोबदला डी.आर. च्या स्वरुपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट -१) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे किवळे येथील स.नं. ७३/१/१/२/५ पै. व ७३/२अ/१ पै. मधील मे.जी.टी.डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. तुषार दत्तात्रय तरस व श्री. अमित राजेंद्र कांकरिया स्वत: करिता व श्री. विठ्ठल हरी तरस व इतर यांचे तर्फे कुलमुखत्यार धारक म्हणून मे.जी.टी.डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. प्रकाश हस्तीमल गादीया व श्री. दत्तात्रय मल्हारी तरस यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील आ.क्र.४/११९ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या प्रस्तावाने बाधित होणारे २७६.११ चौ.मी. क्षेत्राची जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे किवळे येथील स.नं. ७३/२अ/१ पै. व ७३/१/१/२/५ पै.,

आ.क्र.४/११९ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे (EWS)या प्रस्तावाने बाधित होणारे २७६.११ चौ.मी. प्रस्तावाची चतु:सिमा : (एकूण बाधित क्षेत्र- २७६.११ चौ.मी.)

उत्तरेस :- स.नं. ७३ पैकीची मिळकत
पुर्वेस :- स.नं. ७३ पैकीची मिळकत
दक्षिणेस :- स.नं. ७३ पैकीची अर्जदाराची उर्वरित मिळकत
पश्चिमेस :- स.नं. ७३ पैकीची अर्जदाराची उर्वरित मिळकत

परिशिष्ट -२) मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मौजे रावेत येथील स.नं. १५३।२अ मधील श्री. विलास रामचंद्र पालेकर, श्री. प्रविण

रामचंद्र पालेकर, सौ.साधना रामचंद्र पालेकर, श्री. सुनिल प्रकाश पालेकर, सौ.सुशिला प्रकाश पालेकर, दिपाली प्रकाश पालेकर, श्री. सागर प्रकाश पालेकर व स.नं. १५३।१का।१मधील श्री. नंदकुमार भालचंद्र भोंडवे, श्री. सोमनाथ भालचंद्र भोंडवे, सौ. शिला प्रकाश बालवडकर व श्रीम. हिराबाई भालचंद्र भोंडवे यांचेतर्फे कुलमुखत्यारपत्रधारक मे. श्री. धर्मराज डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. राजेंद्र दगडू भोंडवे यांचे मिळकतीमधील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रुंद रस्ता या प्रस्तावाने बाधित होणारे एकुण क्षेत्र ३१७.३५ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा :-

मौजे रावेत येथील स.नं.१५३।२अ मधील २२३.१७ चौ.मी.व स.नं. १५३।१का।१ मधील ९४.१८ चौ.मी.याप्रमाणे एकुण बाधित क्षेत्र ३१७.३५ चौ.मी. ची

उत्तरेस :- स.नं. १५३ पैकी मिळकत
पुर्वेस :- स.नं. १५३ पैकी अर्जदार यांची उर्वरित मिळकत
दक्षिणेस :- स.नं. १५३ पैकी मिळकत
पश्चिमेस :- स.नं. १५१ पैकी मिळकत

परिशिष्ट ३)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे डूडूळगाव येथील गट नं. ९६ पै. मधील मे. राजश्री लँडमार्क एल.एल.पी. तर्फे
भागीदार श्री. संदिप भरत परवाडीया व श्री. प्रविण जे. पोकार यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्ता रुंदी या प्रयोजनाने बाधित क्षेत्र
१६१.०० चौ.मी , जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे
चतु:सिमा : -
मौजे डूडूळगाव, गट नं. ९६ पै., १८ .०० मी. रस्ता रुंदी :- ( बाधित क्षेत्र १६१.०० चौ.मी )

उत्तरेस :- लागू गट नं. ९७ ची मिळकत
पुर्वेस :- लागू गट नं. ९६ पै. ची उर्वरित मिळकत
दक्षिणेस :- .लागू गट नं. ९६ पै. ची मिळकत
पश्चिमेस :- लागू रस्ता.

(राजेंद्र पवार)
उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११०१८

जाहिरात क्र. ३४३
दिनांक २०/८/१९

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

GOVERNMENT OF INDIA PUNE DIST. NOTARY